जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAY 2023
लोकमत

# विद्यापीठात लवकरच आधुनिक कुस्ती संकुल

## कुलगुरू : खेलो इंडिया स्पर्धेत यश प्राप्त केलेल्या खेळाडूंचा गुणगौरव उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लवकरच अत्याधुनिक कुस्ती संकुल आणि सुसज्ज व स्वतंत्र क्रीडा वसतिगृह साकारणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी शुक्रवारी दिली. विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आणि द्वितीय खेलो इंडिया स्पर्धेत यश मिळविलेल्या खेळाडूंच्या गुणगौरव समारंभात (कलर अवॉर्ड) ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत १०२ आणि खेलो इंडिया स्पर्धेत २२ पदके पटकावली.



शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या समारंभात कलर पुरस्कार विजेत्या खेळाडूंसोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड आदी, मान्यवर उपस्थित होते.

महिलांनी एकूण १३ प्रकारांत, तर पुरुषांनी १० प्रकारांत पदके मिळविली आहेत. इनडोअर खेळांसाठी आधुनिक संकुल उभारण्याचा प्रस्ताव केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडे पाठविला आहे.

यावेळी विद्यापीठाचे खेळाडू मयूर रोकडे, स्वाती शिंदे आणि स्वप्नाली वायदंडे यांना शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपक डांगे-पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

### न्यू कॉलेजचा झेंडा

सन २०२१-२२ मधील सर्वोत्कृष्ट क्रीडा कामगिरी बजावणारे महाविद्यालय म्हणून कोल्हापुरातील न्यू कॉलेजला क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर चषक प्रदान करून गौरविण्यात आले. न्यू कॉलेजने सलग सहाव्या वर्षी हा बहुमान प्राप्त केला. कॉलेजच्या वतीने प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी चषक स्वीकारला.

20 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात लवकरच आधुनिक कुस्ती संकुल, क्रीडा वसतिगृह

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; न्यू कॉलेज सहाव्यांदा सर्वसाधारण विजेते; गुणवंत खेळाडूंचा सत्कार




**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विजेतेपदाचा चषक स्वीकारताना न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात लवकरच अत्याधुनिक कुस्ती संकुल व सुसज्ज आणि स्वतंत्र क्रीडा वसतिगृह साकारणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आणि द्वितीय खेलो इंडिया स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंच्या गुणगौरव समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड आणि क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे प्रमुख उपस्थित होते. यावेळी २०२१-२२ मधील सर्वोत्कृष्ट क्रीडा कामगिरी बजावणारे महाविद्यालय म्हणून दि न्यू कॉलेज यांना क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर चषक प्रदान करण्यात आला. न्यू कॉलेजने सलग सहाव्या वर्षी हा बहुमान मिळविला आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'मिशन ऑलिम्पिक' मोहिमेला बळ देण्याचे काम सर्व खेळाडू करीत आहेत. खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत १०२ व खेलो इंडिया स्पर्धेत २२ पदके पटकावली, ही संख्या लक्षणीय आहे. महाविद्यालयांतून खेळाडू पदव्युत्तर शिक्षणासाठी येतात, तेव्हा त्यांचे क्रीडा विषयाकडे दुर्लक्ष होते. मात्र, करिअर म्हणून आता क्रीडा क्षेत्राची निवड करण्यास पोषक वातावरण आहे. शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू मयूर रोकडे, स्वाती शिंदे आणि स्वप्नाली वायदंडे यांना महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. शरद बनसोडे यांनी केले. डॉ. दीपक डांगे-पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

### इनडोअर खेळांसाठी आधुनिक संकुल उभारण्याचा प्रस्ताव

पायाभूत क्रीडा सुविधांचा विकास करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. इनडोअर खेळांसाठी आधुनिक संकुल उभारण्याचा प्रस्ताव केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडे पाठविला आहे. राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वाच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून अत्याधुनिक कुस्ती संकुल उभारण्यात येणार आहे. त्याचा स्वतंत्र क्रीडा वसतिगृहाचा प्रस्ताव मंजूर झाला असून, लवकरच कामास प्रारंभ होईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष

2 0 MAY 2023 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कलर पुरस्कार विजेत्या खेळाडूंसोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. दीपक डांगे-पाटील आदी.

# विद्यापीठात लवकरच कुस्ती संकुल, वसतीगृह

- कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची घोषणा
- राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वानिमित्त प्रस्तावाला मंजुरी
- -अखिल भारतीय आणि खेलो इंडिया स्पर्धेतील यशवंत खेळाडूंचा कलर ॲवार्डने सन्मान

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा गाजविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंना विविध सोयी, सुविधा आणि आर्थिक बळ देण्यासाठी विद्यापीठ प्रशासन आणि क्रीडा विभाग कटिबद्ध आहे, असे स्पष्ट करत खेळाडूंच्या आजवरच्या मागणीचा विचार करून विद्यापीठात लवकरच अत्याधुनिक कुस्ती संकुल आणि सुसज्ज व स्वतंत्र अशा क्रीडा वसतिगृहाची उभारणी केली जाणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी शुक्रवारी केली. राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षांनिमित्त आयोजित कृतज्ञता पर्वाच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने ही उभारणी केली जाणार असल्याचेही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या २०२१-२२ शैक्षणिक वर्षामधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आणि खेलो इंडिया स्पर्धेत घवघवीत यश संपादन केलेल्या खेळाडूंचा शुक्रवारी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सन्मान झाला. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरूवात झाली.

कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. विविध स्पर्धांत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या न्यू कॉलेजला क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर चषकाने गौरविण्यात आले. न्यू कॉलेजने सलग सहाव्या वर्षी हा बहुमान प्राप्त केला आहे. शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू मयूर रोकडे, स्वाती शिंदे आणि स्वप्नाली वायदंडे यांना राज्य शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. दीपक डांगे-पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ शुक्रवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. दुसऱ्या छायाचित्रात क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर चषक कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना दि न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील.

# विद्यापीठात लवकरच आधुनिक कुस्ती संकुल

## कुलगुरू डॉ. शिर्के; न्यू कॉलेज सलग सहाव्यांदा सर्वसाधारण विजेते

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. १९ :** शिवाजी विद्यापीठात लवकरच अत्याधुनिक कुस्ती संकुल आणि सुसज्ज व स्वतंत्र क्रीडा वसतिगृह साकारण्यात येणार आहे, असे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे सांगितले. विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आणि द्वितीय खेलो इंडिया स्पर्धेत यशस्वी खेळाडूंच्या गुणगौरव समारंभात (कलर अॅवॉर्ड) ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या समारंभास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते. सन २०२१-२२ मधील सर्वोत्कृष्ट क्रीडा कामगिरी बजावणारे महाविद्यालय म्हणून दि न्यू कॉलेजला क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर चषकाने गौरविण्यात आले. सर्वाधिक ५७८ गुण घेत दि न्यू कॉलेजने सलग सहाव्या वर्षी हा बहुमान पटकावला.

### वर्षभरात १०२ पदकांची कमाई

■ विद्यापीठाच्या खेळाडूंनी वर्षभरात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धांतील विविध क्रीडा प्रकारांत १०२ आणि खेलो इंडिया स्पर्धेत २२ पदके पटकावली. महिला खेळाडूंनी एकूण १३ प्रकारांत, तर पुरुषांनी १० प्रकारांमध्ये पदके मिळविली आहेत.

डॉ. शिर्के म्हणाले, "महाविद्यालयांतून हे खेळाडू जेव्हा पदव्युत्तर शिक्षणात येतात, तेव्हा त्यांचे क्रीडा विषयाकडे दुर्लक्ष होते. मात्र, करिअर म्हणून आता क्रीडा क्षेत्राची निवड करण्यास पोषक वातावरण आहे. इनडोअर खेळांसाठी आधुनिक संकुल उभारण्याचा प्रस्ताव केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडे पाठविला आहे. राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वाच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून अत्याधुनिक कुस्ती संकुल उभारण्यात येईल. त्याचा आणि स्वतंत्र क्रीडा वसतिगृहाचा प्रस्ताव मंजूर झाला असून, लवकरच त्यांच्या कामास प्रारंभ करण्यात येईल."

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, "विद्यापीठाचे खेळाडू विविध खेळांसह रग्बी, कयाकिंगसारख्या क्षेत्रात यश मिळवताहेत, ही अभिमानाची बाब आहे." प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, "करिअर करण्याच्या नादात खेळातून आनंद मिळविणे मात्र सोडू नका."

खेळाडूंसह संघव्यवस्थापक, क्रीडा प्रशिक्षकांना ब्लेझर, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान देऊन गौरविण्यात आले. न्यू कॉलेजतर्फे नागेशकर चषक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वीकारला. मयूर रोकडे, स्वाती शिंदे, स्वप्नाली वायदंडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. डॉ. दीपक डांगे-पाटील यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAY 2023

पुढारी

## शिवाजी विद्यापीठ आयोजित 'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला

# 'भारत आणि दहशतवाद' या विषयावर आज ॲड. उज्ज्वल निकम यांचे व्याख्यान



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत निष्णात कायदेपंडित पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांचे शनिवारी (दि. २० मे) सायंकाळी ४.४५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. 'भारत आणि दहशतवाद' या विषयावर ते या व्याख्यानमालेत आपले पुष्प गुंफणार आहेत.

भारतापुढील दहशतवादाचे गंभीर आव्हान, त्यातील उपाययोजना अशा विविधस्पर्शी मुद्द्यांवर ते व्याख्यानातून आपले विचार मांडणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के हे व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान भूषवणार असून, विद्यापीठाचे पान ४ वर

### व्याख्यान नियोजित वेळेतच

ॲड. उज्ज्वल निकम त्यांच्या नियोजित कार्यक्रमासाठी परगावी जाणार आहेत. त्यामुळे 'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमालेतील त्यांचे व्याख्यान सायंकाळी ठिक ४.४५ वाजता सुरू होणार आहे. त्यामुळे या व्याख्यानास सर्वांनी नियोजित वेळेपूर्वी १५ मिनिटे आधी उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

पान १ वरून


## 'भारत आणि दहशतवाद' या विषयावर आज ॲड. उज्ज्वल निकम यांचे व्याख्यान

प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. ॲड. उज्ज्वल निकम यांचा विविध विषयांवर सखोल अभ्यास आहे. अनेक किचकट आणि गुंतागुंतीच्या खटल्यांमध्ये त्यांनी विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहिले आहे. २६/११/२००८ रोजी मुंबईवर पाकिस्तान प्रशिक्षित दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात अजमल कसाब हा एकमेव दहशतवादी जिवंत सापडला. कसाबला फाशीची शिक्षा देण्यात आली. या सर्व खटल्यामध्ये विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. उज्ज्वल निकम यांनी काम पाहिले आहे. हा खटला अत्यंत किचकट होता. मात्र, आपल्या ज्ञानकौशल्याच्या बळावर ॲड. निकम यांनी सरकारच्या वतीने न्यायालयात बाजू लढविली. आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानी दहशतवादाचा भेसूर चेहरा त्यांनी उघड करून दाखविला. भारतासमोर दहशतवादाचे आव्हान आजही कायम आहे. भाराताविरुद्धच्या दहशतवादात पाक लष्कराचा उघड सहभाग असल्याचे ट्विट गुरुवारीच पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी केले. त्यामुळे जगभर खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर 'भारत आणि दहशतवाद' या विषयावर ॲड. निकम यांचे व्याख्यान होणार आहे.

लोकमत

# उज्ज्वल निकम यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे



पुढारीकार ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांचे आज शनिवारी (दि.२० मे) सायंकाळी ५ वाजता शाहू स्मारक भवनात व्याख्यान होत आहे. भारत आणि दहशतवाद असा व्याख्यानाचा विषय आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हे व्याख्यान होणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित असतील. त्यास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

पुढारी



# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ··· निमंत्रण ···

**'पुढारीकार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव**
**स्मृती व्याख्यानमाला'**

सदर व्याख्यानमालेअंतर्गत

**"भारत आणि दहशतवाद"**

या विषयावर

**मा. पद्मश्री श्री. उज्वलजी निकम**

निष्णात कायदेपंडित

यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.

या प्रसंगी

**मा. प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**

कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

प्रमुख उपस्थिती

**मा. प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**

प्र-कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरी आपण या कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव

---

* स्थळ : राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर

* तारीख व वेळ : शनिवार, दि. २० मे, २०२३ रोजी सायं. ४.४५ वाजता

निमंत्रितांनी कृपया निर्धारित वेळेपूर्वी १५ मिनिटे स्थानापन्न व्हावे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAY 2023
पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव यांचा युवा शिक्षण हिताचा विचार

**दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांनी विद्यार्थी-युवक हा घटक आपल्या पत्रकारितेच्या केंद्रभागी ठेवला होता. शिक्षण व्यवस्थेत सर्वात वरच्या स्थानावर असलेल्या या घटकाला त्यांनी खंबीर साथ दिली. प्रचंड मोठ्या प्रमाणात असलेली ही ऊर्जा विधायक कामासाठी वापरात यावी, असा त्यांचा आग्रह होता. राष्ट्र उभारणीच्या कामात विद्यार्थ्यांची मदत घेतली पाहिजे, हा त्यांचा विचार आजच्या स्थितीतही कालसुसंगत आणि तितकाच अग्रक्रमाचा आहे. आज (दि. २० मे) त्यांचा स्मृतिदिन. त्यानिमित्ताने...**

कोणत्याही समाजात विद्यार्थी-युवक हा महत्त्वाचा आणि तितकाच निर्णायक घटक असतो. राजकीय, सामाजिक किंवा सांस्कृतिक प्रक्रियेत विद्यार्थी अनेक पातळ्यांवर सक्रिय सहभागी असतात; परंतु त्यांची वेगळी नोंद अपवादानेच घेतली जाते. प्रचंड ऊर्जा असलेल्या या घटकाकडे 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांनी मात्र पुरेसे लक्ष दिले होते. शिक्षण हा त्यांचा सुरुवातीपासून जिव्हाळ्याचा विषय होता. अध्ययन, अध्यापनासह संस्थानी काळातील दरबारचे आदेश असो किंवा स्वतंत्र भारतातील सरकारने घेतलेले काही निर्णय असो, ग. गो. जाधव यांनी सातत्याने विद्यार्थ्यांच्या हिताची पाठराखण केली; पण याचा अर्थ त्यांनी प्रत्येक वेळी विद्यार्थ्यांचे कोडकौतुकच केले, असे नाही. विद्यार्थी चुकत असतील, तर त्यांनी वेळोवेळी विद्यार्थ्यांचे कान धरले होते. एक सम्यक, संतुलित, कुशल, व्यवहारी आणि देशाच्या विकासात योगदान देणारा विद्यार्थी तयार व्हावा, अशी त्यांची भूमिका होती.

**सामाजिक न्यायाचा विचार**


संस्थानी राजवटीत करवीर सरकारच्या विद्यार्थी विषयक धोरणांवर डॉ. ग. गो. जाधव यांनी सातत्याने आपली भूमिका मांडली होती. राजर्षी शाहू महाराज आणि त्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांच्या प्रयत्नांमुळे उच्च शिक्षणाला गती मिळाली. मात्र, शिक्षणासाठी करवीर सरकारवर मोठा बोजा पडू लागल्याने आणि त्यातच युद्धकर लागू झाल्याने हायस्कूलच्या फीमध्ये काहीशी वाढ करण्यात आली होती. या फीवाढीचा करवीर सरकारने पुनर्विचार करावा, असे आवाहन ग. गो. जाधव यांनी ७ जुलै १९४१ रोजी लिहिलेल्या अग्रलेखात केले होते. 'हायस्कूलमध्ये बहुजन समाजातील गरीब कुटुंबांतील मुले शिक्षण घेतात. विशेषतः, मागासलेल्या वर्गातील मुलेही हायस्कूलमध्ये शिक्षण घेऊ लागली आहेत. फीवाढीमुळे अशा गरीब तसेच मागासलेल्या वर्गातील मुलांच्या शिक्षणावर परिणाम होऊ शकतो. म्हणून या फीवाढीचा कौन्सिलने फेरविचार करावा, अशी आमची नम्र; पण आग्रहाची विनंती आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. शिक्षणाच्या प्रक्रियेतून गरीब आणि वंचित समूह बाजूला पडू नये, ही त्यांची तळमळ होती. विद्यार्थी हिताच्या दृष्टीने त्यांची ही भूमिका सामाजिक न्यायाचा विचार रूजवणारी होती.

**विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी आग्रही**

करवीर इलाख्यातील सरकारी हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांची फीवाढ झाल्यानंतर काही दिवसांतच मोफत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींवरही काहीसा शुल्कवाढीचा बोजा टाकण्यात आला होता. हा निर्णयही ग. गो. जाधव यांना रूचला नव्हता. फी वाढल्यास सर्वसामान्य पालक फक्त मुलांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करतील आणि मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होईल, अशी भीती त्यांना वाटत होती. १७ जुलै १९४१ रोजीच्या अग्रलेखात त्यांनी ही बाब करवीर दरबारच्या निदर्शनास आणून दिली होती. ज्या मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ५०० रुपयांहून कमी आहे, अशा विद्यार्थिनींना सरकारी हायस्कूलमध्ये पूर्णपणे फी माफी देण्याचा फेरहुकूम काढल्यानंतर ग. गो. जाधव यांनी त्याचे खुलेपणाने स्वागत केले. विद्यार्थिनींच्या शिक्षणाबाबत ते खूपच आग्रही होते. करवीर प्रांतात मुलींच्या शिक्षणासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. मात्र, याचा लाभ सवर्ण मुलींना जास्त प्रमाणात मिळत होता. गरीब आणि इतर वर्गातील तसेच बहुजनसमाजातील मुली शिकल्या पाहिजेत, यासाठी त्यांची धडपड होती. म्हणून तर त्यांनी मुलींच्या शिक्षणात शुल्कवाढीचा विषय येताच अशा वाढीला विरोध दर्शवला होता.

**विद्यार्थी-प्रशासन संबंध**

विद्यार्थी आणि प्रशासन यांच्यात कसे संबंध असायला हवेत, यावरही ग. गो. जाधव यांनी भाष्य केले आहे. विशेषतः, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी कॉलेज प्रशासनाने कसे वागावे, याचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला आहे. कोल्हापुरातील राजाराम कॉलेजचे प्रशासन आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध कारणांवरून संघर्ष झाला होता. त्यावेळी ७ फेब्रुवारी १९४१ च्या अग्रलेखात ग. गो. जाधव लिहितात, 'कॉलेजातील विद्यार्थी सामान्यपणे प्रौढ आणि स्वतःवरील जबाबदारी जाणणारे असतात, असे मानले जाते. त्यामानाने त्यांच्यावर जबाबदारी टाकणेही क्रमप्राप्तच असते. मात्र, कोणी बेजबाबदारपणा करतो आहे, असे वाटल्यास तेवढ्यापुरता हस्तक्षेप करण्याचा हक्क वरिष्ठांनी जरूर बजावला पाहिजे. एरव्हीच्या कामात मात्र विद्यार्थ्यांशी सहानुभूतीने वागून त्यांना आपापल्या जबाबदाऱ्या योग्य तऱ्हेने पार पाडण्यास मदत करणे हेच वरिष्ठांचे कर्तव्य आहे.' सध्याच्या काळात महाविद्यालये, विद्यापीठे तसेच अन्य तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या



प्रशासनाने ग. गो. जाधव यांची विद्यार्थ्यांप्रति असलेली संवेदनशीलता समजून घेतली आणि प्रशासनाने कुठपर्यंत हस्तक्षेप करावा याचे तारतम्य बाळगले, तर शिक्षण संस्थांतील संघर्ष कमी व्हायला मदत होईल.

**विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव**

ग. गो. जाधव यांनी नेहमी विद्यार्थी हिताचा पुरस्कार केला, हे जरी खरे असले तरी विद्यार्थी जर चुकत असेल, तर मात्र त्यांनी विद्यार्थ्यांना कधीच पाठीशी घातले नाही. त्यांच्या चुका निदर्शनास आणून दिल्या. प्रसंगी त्यांना मार्ग काढण्यासाठी मदत केली. नव्या वाटांचा शोध घेण्यासाठी दिशा दिली. मुंबई प्रांतातील सरकारने १९४१ मध्ये त्या काळातील दुय्यम आणि उच्च शिक्षणाचे शुल्क वाढविले. ज्यांना शुल्क भरणे शक्य नाही, अशा विद्यार्थ्यांनी आपली आर्थिक स्थिती दर्शवणारी कागदपत्रे सादर करावीत, अशी अट प्रांतिक सरकारने घातली. मात्र, या अटीला न जुमानता विद्यार्थ्यांनी फीवाढीच्या विरोधात आंदोलन पुकारले. ग. गो. जाधव यांना ही बाब खटकली. सरकारने गरीब विद्यार्थ्यांना फीवाढीतून सूट दिलेली होती. आपण गरीब आहोत, हे त्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांच्या आधारे सिद्ध करायचे होते. परंतु, विद्यार्थी या अटीला बगल देऊन चुकीच्या मार्गाने चालले होते. 'फीवाढ डोईजड होत आहे हे दाखविण्याची जबाबदारी विद्यार्थी अगर त्यांचे पालक यांच्यावर आहे. ते तसे पुराव्याने दाखवतील तरच त्यांच्या न्याय्य मागणीस सर्वांचाच पाठिंबा मिळेल,' या शब्दांत ग. गो. जाधव यांनी विद्यार्थ्यांना सुनावले होते. याचाच अर्थ त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्येक मागणीला पाठिंबा दर्शवला नाही. विद्यार्थी चुकीची भूमिका घेत असतील, तर त्यांना या चुकांची जाणीव करूनदेण्याचे महत्त्वाचे काम ग. गो. जाधव यांनी केले होते.

**विद्यार्थी चळवळींना मार्गदर्शन**

विद्यार्थी तरुण असतात. त्यांच्यात प्रचंड ऊर्जा असते. शिवाय, तारुण्यात अनेकवेळा योग्य-अयोग्य याची निवड करता येत नाही. अशा स्थितीत काही लोक किंवा संघटना विद्यार्थ्यांच्या या शक्तींचा गैरफायदा घेतात. ग. गो. जाधव ही बाब जाणून होते. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी या संघटनांच्या भूलथापांना बळी पडून भरकट जाऊ नये, अशी त्यांची भावना होती. 'विद्यार्थ्यांच्या चळवळीस अनिष्ट वळण' या अग्रलेखात त्यांनी सप्रमाण हे दाखवून दिले आहे. कोल्हापूर स्टुडंट युनियन या नावाच्या संघटनेची फारशी कोणाला माहिती नव्हती तसेच ही संघटना नोंदणीकृतही नव्हती. परंतु, या संघटनेच्या झेंड्याखाली अनेक तरुण एकवटले आणि त्यांनी काही अनिष्ट गोष्टी केल्या. या तरुण विद्यार्थ्यांना आपण कोणाच्या तरी जाळ्यात फसत आहोत, याची जराही कल्पना नव्हती. मात्र, ग. गो. जाधव यांनी त्यांना ही जाणीव करून दिली. 'विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासाव्यतिरिक्त वेळांत खरोखरच काही लोकहित साधायचे असेल, तर त्यांनी विधायक कार्य हाती घ्यावे. आपल्या अडाणी बांधवांना साक्षर करण्याचे एकच कार्य त्यांनी हाती घेतले, तर ती त्यांची फार मोठी देशसेवा होईल,' असा पर्यायी समाजहिताचा कार्यक्रमही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला होता. एका अर्थाने ग. गो. जाधव विद्यार्थ्यांच्या चळवळीला विधायक मार्गावर घेऊन जाण्याचा प्रयत्न करत होते. चळवळीत सहभागी होणारी बहुजन समाजातील मुले असतात. चळवळ भरकटलेली असेल, तर अंतिमतः बहुजन समाजाचेच नुकसान होणार आहे, हा धोका त्यांनी ओळखला होता आणि आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून ते सातत्याने समाजासमोर या धोक्याची तीव्रता ठळकपणे मांडत होते.

पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांच्या चळवळीला बळ दिले. आर्थिक स्थिती बेताची असल्याने प्रचंड क्षमता असूनही शिक्षण अर्ध्यातच सोडून द्यावे लागले असले, तरी ग. गो. जाधव यांची शिक्षणविषयीची तळमळ तसूभरही कमी झाली नव्हती. या तळमळीतूनच त्यांनी विद्यार्थी हा घटक समोर ठेवून त्यांच्या शक्तीला सकारात्मक वळणावर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. तरुण विद्यार्थी हेच उद्याचे सुजाण नागरिक आहेत आणि देश पुढे घेऊन जाण्याचा सर्वात मोठा वाटा विद्यार्थ्यांचा असणार आहे, याची त्यांना नीट जाणीव होती. म्हणून त्यांनी विद्यार्थिकेंद्रित पत्रकारितेवर विशेष भर दिला होता आणि हे ग. गो. जाधव यांच्या पत्रकारितेचे वेगळेपण आणि वैशिष्ट्यही आहे.

**- डॉ. शिवाजी जाधव,**
(समन्वयक, पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्र, शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAY 2023
सकाळ

# अधिविभागप्रमुख बैठकीत कुलगुरूंकडून कानउघाडणी

कोल्हापूर, ता. १९ : 'वर्गात तासिका वेळेवर घेण्यात याव्यात, परीक्षाविषयक कामात टाळाटाळ करू नका, विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासह परीक्षांचे कामकाज नीट आणि वेळेत करा. त्यात कामचुकारपणा केल्यास कारवाई केली जाईल', असा इशारा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी प्राध्यापकांना दिला. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात गुरूवारी सुमारे दोन तास चाललेल्या अधिविभागप्रमुखांच्या बैठकीत त्यांनी या स्वरूपात एकप्रकारे शाब्दिक छडी उगारली.

विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये काही प्राध्यापक तासिका घेण्यात टाळाटाळ करत आहेत. वेळेत तासिका घेत नाहीत. परीक्षांचे पर्यवेक्षण, उत्तरपत्रिकांची तपासणी आदी कामकाजांकडे दुर्लक्ष करत असल्याच्या तक्रारी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे दाखल झाल्या. त्यावर त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासह परीक्षाविषयक कामकाजाबाबत अशा प्राध्यापकांना शिस्त निर्माण व्हावी, या उद्देशाने अधिविभागप्रमुखांची बैठक घेतली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

वर्गात वेळेत तासिका घेणे हे प्राध्यापकांचे कर्तव्य आहे. त्यांनी ते काळजीपूर्वक करावे. परीक्षा कामकाज करणे ही देखील त्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे त्यांनी याबाबत दुर्लक्ष करू नये. वेळेत निकाल जाहीर करण्याची विद्यापीठाची परंपरा आहे. ती कायम राखण्यासाठी त्यांनी योगदान द्यावे. तासिका घेणे, परीक्षा कामकाजामध्ये चालढकल, हलगर्जीपणा यापुढे खपवून घेतला जाणार नाही. कामचुकारपणा करणाऱ्यांवर विद्यापीठ कायद्यातील तरतुदींनुसार आणि माझ्या अधिकारामध्ये कारवाई केली जाईल, असा इशारा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिला. परीक्षा कामकाजाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांबाबतचा अहवाल सादर करण्याचा आदेश त्यांनी मंडळाचे संचालक डॉ. जाधव यांना दिला. वर्गात गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी लावण्याचे प्रकार करू नयेत. शिस्तीबाबतच्या नियम, तरतुदींचे पालन करावे, अशी सूचना प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे यांनी केली.

## शैक्षणिक धोरण, प्रवेशाबाबत मार्गदर्शन

■ परीक्षाविषयक कामकाज, प्रवेश प्रक्रिया आणि जूनपासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, आदींबाबत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी अधिविभागप्रमुखांना मार्गदर्शन केले. विभागातील प्राध्यापकांच्या कामामध्ये शिस्त कायम राखली जाईल यादृष्टीने लक्ष देण्याची सूचना त्यांनी केली. दरम्यान, नियमित आणि शिस्तीचे पालन करून विभागांचे काम पाहणाऱ्या अधिविभागप्रमुखांनी कुलगुरूंच्या या भूमिकेबाबत समाधान व्यक्त केले.